RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 1000/-

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

-4494 Impact factor 2.7286

ssion and registered
ia.
thi will be published
English on one side
D. Scholars should
of papers should be
violated copy right
n. This undertaking
14
age and references
pted by Research
committees. the
stered post only.
iction only.
ely. The editor,
m. At the same
e for their own



## अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | A Study of Social and Political Victims in Arundhati Roy's | Dr. Shivaji Pawar, | 1 |
| 2 | The Forgotten "First Nightangle" in My Garden | Dr.Khan A. S. | 6 |
| 3 | Effects Of Learning Disability On Academic Achievement Among school going Students. By | Dr.Bharat H Mimrot, | 11 |
| 4 | Spiritual Intelligence and Academic achievement of adolescence | Dr.S.M.Watore | 22 |
| 5 | RELIGION WISE POPULATION IN JALNA DISTRICT: A GEOGRAPHICAL ANALYSIS | Pramod B. Deshmukh, | 28 |
| 6 | A view of Thomas Kuhn and Growing Paradigm of Geography | Dr. Sonavane Sudarshan Venkatrao | 32 |
| 7 | Transformation of Raju from a Tourist Guide to a Spiritual Guide with Reference | Mrs. Sujata Gomteshwar Patil | 41 |
| 8 | A Study of Social and Political Victims in Arundhati Roy's | Dr.Waghmare M.S. | 47 |
| 9 | Resource sharing in electronic Era | Mrs.Dhanawanti Sunil Bamane. | 56 |
| 10 | IMPORTANCE OF GALLI KHAL FOR ENHANCEMENT OF HUMAN HEALTH AND PERFORMENCE | Dr. Suresh Nalawade | 62 |
| 11 | Role of media in popularizing game of Kabaddi | Dr.K.G.Machale | 67 |
| 12 | A Research Article entitled Knowledge Process Outsourcing in India By | Dr. Rajendra Udhan, | 71 |
| 13 | Factors Affecting Smallholder Sugarcane Productivity | V.C. Borkarb<br>H. P. Thorata, | 76 |
| 14 | बहिणाबाईच्या कवितेतील जीवनविषयक तत्वज्ञान | प्रा.रेखा व्ही.इंगोल | 85 |
| 15 | समकालीन राजनीतिक काव्य में सामाजिक चेतना | प्रा. डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 89 |
| 16 | वारकरी संप्रदायातील फड : स्वरूप व कार्य | प्रा. डॉ. गोपाल ढोले | 95 |
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्र विषयक भूमीका | सुरवसे तुकाराम नागनाथ<br>डॉ. राजशेखर नळगे | 99 |
| 18 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीत आणि शिक्षण विषयक विचार | डॉ. तुळशीराम उकिरडे | 103 |
| 19 | अनुवाद समस्या आणि उपाय | डॉ. वैशाली सूर्यकांत रोकडे | 106 |
| 20 | ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरूष तुलनाङ निबंधातील स्त्रीवादी विचार स्वरूप | प्रा.जगदाळे किरण आगतराव | 110 |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्र विषयक भूमीका

**संशोक**
**सुरवसे तुकाराम नागनाथ**

**मार्गदर्शक**
**डॉ. राजशेखर नळगे**

## प्रस्तावना :-

मानवी जीवन विकासाच्या इतिहासाच्या प्रदीर्घ प्रक्रियेत वृत्तपत्राचे स्थान एक महत्वपूर्ण अशा तत्वाचे राहिलेले आहे.व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत वृत्तपत्रांची महत्वाची भुमीका असते.या ऐतिहासिक सत्याचा सर्वांनीच स्विकार केलेला आहे.१७ व्या , १८ व्या आणि १९ व्या शतकात इंग्लंड, फ्रान्स , इटली, जर्मनीव अन्य पाश्चात्य राष्ट्रे, आणि भारत यामध्ये ज्या ज्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळी किंवा परिवर्तन झाली, त्यात वृत्तपत्राचे योगदान मोलाचे आहे.

अस्पृश्यता आणि जातीयतेच्या अग्निदिव्यातून तावून सलाखून निघालेल्या तेजस्वी व्यक्तीमत्वाचे दर्शन म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरहजारो वर्षापासून पिढयान्‌पिढया चालत आलेल्या रुढी, परंपरा आणि बुरसटलेल्या चालिरीती विरुद्ध अनेक थोर पुरुषांनी बंड पुकारले परंतू प्रत्यक्ष या अमानवी रुढी परंपरांच्या दलदलीतूनआपल्या संपूर्ण समाजाला वर आणण्यासाठी आयुष्यभर झटणारेडॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पहिले महापुरुष होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुकनायक, बहिष्कृत भारत आणि जनता हीवृत्तपत्रे काढली.व ३१ जानेवारी १९२० मध्ये आपले पहिले पाक्षिक वृत्तपत्र मुकनायक सुरु केले आहे. या वृत्तपत्राच्या प्रकाशनासाठी कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी२५०० रुपयांची देणगी दिलीहोती. त्या देणगीचे मोल त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना खूप महत्वाचे वाटले.त्यांनीआपल्या वृत्तपत्रामध्ये वृत्तपत्र विषयक भुमीका स्पष्टपणे मांडली.

## मुकनायक :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुकनायक या पाक्षिकाची निर्मीती निश्चीत अशा उद्दीष्टाने प्रेरीतहोऊन केलेली आहे.कारण त्यांना अस्पृश्यतेमध्ये आत्मजाणीव - जागृती करावयाची होती. अस्पृश्यतांच्या हिता-अहिताची चर्चा करावयाची होती. त्यांच्या व्यथा वेदनांना वाचा फोडावयाची होती.त्यांच्यावर सर्वच स्तरावरीलहोणाऱ्या अन्याय, अत्याचारालासरकारपुढे मांडावयाचे होते.व तसेच अस्पृश्यामध्ये स्वाभीमानाची ज्योत जागृत करावयाची होती.त्यांना त्यांच्या उद्धाराचा मार्ग दाखवून द्यावयाचा होता.त्यासाठी त्यांच्यात स्वाभिमान व राजकीय हक्काविषयीची जागृती निर्माण करावयाची होती.राजकीय क्षेत्रात त्यांना वेगळे हक्क प्राप्त करुन द्यावयाचे होते.ही सर्व उद्दीष्टे साध्य करण्याची एक प्रभावी माध्यम म्हणजे वृत्तपत्र आहे याची त्यांना पुर्ण जाणीव झालीहोती.म्हणूनचत्यांनी'मुकनायक'या पाक्षिकाचा प्रारंभ केलेला.हजारो वर्ष ज्या अस्पृश्य जातींनाहिंदूसमाज-व्यवस्थेने व धर्म व्यवस्थेने



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

मुकबधिर बनविले, अशा मुक्यांना बहिऱ्यांना वाच्या, मती आणि गती देण्याच्या उद्दीष्टाने मुकनायकाचात्यांनी प्रारंभ केला.त्याद्वारेहिंदू समाजात परिवर्तन व सुधारणा करण्याचे कार्यहोत्यांनीकेले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वृत्तपत्राची आवश्यकता या उद्दीष्ट पुर्तीसाठी वाटली म्हणूनत्यांनी त्याच भुमीकेतून मुकनायक या वृत्तपत्राची निर्मीती केली.'मुकनायक'हा अस्पृश्यतांचा मुक्तीसंग्रामाचा पाया भक्कम करणारा विचारदेणारा, अस्पृश्यांच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिकउन्नती करणारा व अस्पृश्यांच्या सर्वांगीन विकासाला गती देणारा वृतपत्र म्हणजे'मूकनायक'होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेतून मुकनायक द्वारे मुक्यांना बोलते केले.बहिष्कृत समाजाला प्रबोधित करुन अन्यायाविरुद्ध संघर्षास तयार केले.त्यामुळे एक नवा इतिहास घडला आणि जुना इतिहास बदलविला गेला.इतिहास घडवणे एक वेळ सोपे असते पण इतिहास बदलविणे महाकठीण असतेपण हे महापराक्रमी कार्य त्यांच्या पत्रकारीतकेमुळे घडले.

## बहिष्कृत भारत :

बहिष्कृत भारत हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दुसरे वृत्तपत्र आहे.रविवार दि. ३ एप्रिल १९३७ साली'बहिष्कृत'भारत या पाक्षिक वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला.मुकनायकाच्या अस्तानंतर ६ वर्षांनी या वृत्तपत्राची निर्मीती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहे.या वृत्तपत्राची उद्दीष्टेहिंदू, स्पृश्य - अस्पृश्यता नष्ठ करणे, जन जागृती करणेहाहोता.त्यात त्यांनी मुकनायकातील पहिल्या अंकातील मनोगतातून वृत्तपत्राच्या परिवर्तनवादी उद्दीष्टांचाजोउल्लेख केलेला आहे.त्या उदिष्टपुर्तीसाठी पुन्हा'बहिष्कृतभारत' हे वृत्तपत्र सुरू केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीयहक्क आणि सामाजिकहक्काच्या प्राप्तीसाठी बहिष्कृत, भारताची निर्मीती केलेली आहे.त्यापुर्वी त्यांनी २० जुलै १९२४ साली बहिष्कृत हितकारीणी सभा स्थापन केलीहोती.तीची उद्दीष्टेशिका,संघटीत व्हा आणि संघर्ष कराहीहोतीहे उद्दीष्टे प्राप्त करण्यासाठी बहिष्कृत भारत वृत्तपत्राची निर्मिती केली बहिष्कृतांची उन्नती करण्यास्तव प्रथम त्यांच्यात वृत्तपत्राद्वारे जागृती करणे, त्यांच्या मनात उन्नतीची जाणीव निर्माण करणे, आत्मजाणीव निर्मीण करणे, त्यांच्यातील दैववादी वृत्ती नष्ट करणे व नव विचाराचे चैतन्य निर्माण करणेहोता. बहिष्कृत भारातच्या लढाऊ धोरणाससाजेशा अशा ज्ञानेश्वरीतील पुढील ओळी बिरुदावली म्हणूनत्यांनी घेतलेल्या होत्या त्यावरुन उद्दीष्टेस्पष्टहोतात.त्या ओळी अशा

**आता कोदंड घेऊनहाती। आरुए पां इथे रथी ।।**

**देई अलिंगन वीरवृत्ती ।समाधाने।।**

**जगी किर्ती रुढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ।।**

**या भारा पासोनी सोडवी । मेदिलीहे।**



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur. Dist. Osmanabad.

या ओळीचा अर्थ संघर्षासाठीसमर्थ बनणे, क्रांतीसाठी समर्थ बनणे, अन्याय-अत्याचार-गुलामी विरुदच्या संघर्षासाठी समर्थ बनणे, वीरवृत्ती धारण करणे आणि स्वसामार्थ्याने किर्ती मिळविण्यास तयारहोऊन मानव मुक्तीच्या संग्रामात झोकुन देऊन, दास्यश्रृकला, तोडण्यासाठी क्रांतीची मशाल हातात घेऊन, निर्भयपणे व वीरवृत्तीने सामोरे जाणे, अन्याय-अत्याचार-विषमता या विरुध्द लढणेहोते. यासाठीचत्यांनी वृत्तपत्राचा प्रारंभ केलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत या पाक्षीक वृत्तपत्राकडे एक संघर्षाचे साधन म्हणूनतर पाहिले आहेच, परंतु व्यक्ती आणि समाजात जागृती आणि परिवर्तन करणारे एक महत्वपुर्ण माध्यम म्हणूनही पाहिलेले आहे. बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र हे विचार आणि लेखणी द्वारेसंघर्ष करणारे माध्यम आहेहे त्यांना अभिप्रेत होते.वृत्तपत्राद्वारे त्यांना समतावादी विचार, धारणा, मुल्ये, तत्वज्ञान व श्रध्दा, सर्व हिंदू समाज मनात बहिष्कृत भारत वृत्तपत्राद्वारे संदेश पेरावयाचे होते.वृत्तपत्र हे दुधारी स्वरुपाचे शस्त्र आहे.हे त्यांना पुर्ण कल्पना आहे या दुधारी शस्त्राचा प्रयोग करुन त्यांना हिंदुसमाजातील स्पर्श व अस्पृश्य समाज घटकांना योग्य अशी विचारांची, कल्याणाची आणि विकासाची तसेच, समता, बंधुता व न्यायाची दिशा दिग्दर्शीत करावयाची होती. सिंहगर्जनेने ज्या प्रमाणे सर्व जंगल जागृतहोते, तशीच जागृती बहिष्कृत भारत वृत्तपत्राद्वारे हिंदू समाजरुपी जंगलात त्यांना करावयाची होती.कारण त्यांना वृत्तपत्र हे किमयेचे साधन आहे याचीठाम जाणीव झालेलीहोती.

**जनता :-**

गुलामालातु गुलाम आहेस असे सांगा म्हणजेचतो बंड करुन उठेल..!हे ब्रीद वाक्य 'जनता' वृत्तपत्राच्या शिर्षभागी लिहलेले असेलत्यामुळे अस्पृश्यांना बंडखोरीचे आणि अन्याया विरुध्द संघर्षाचे तत्वज्ञान देण्याच्या उद्दिष्टांनेच'जनता'वृत्तपत्राची निर्मीती झाली.२४ नोव्हेंबर १९३० मध्ये जनताचा प्रथम अंक प्रकाशित झाला.

साप्ताहिक'जनता'वृत्तपत्र हेहिंदू समाज व्यवस्थेने व धर्म व्यवस्थेने निर्माण केलेल्या अस्पश्यतेमुळे गुलाम झालेला कनिष्ट जातीतील लोकांना जागृत करण्याच्या आणि त्यांच्या मध्ये समग्र परिवर्तन व सुधारणा करण्याच्या ध्येयवादानेच कार्यरतहोते. जनता वृत्तपत्राच्या उद्दिष्टा संबधी स्वता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेले विचार असे-जनतेच्या प्रचारात झटण्यासाठी आणि या आपल्या वृत्तमानपत्राची सर्वांग सुंदर प्रगती घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे, अस्पृश्य स्त्री-पुरुषांचे कर्तव्य आहे. जनतेची आजचीस्थिती चांगली नाहीहे वाचुन अंत्यत वाईट वाटले. दलितसमाजाचीहोत असलेली कुंचूबणा व मानहानी याचा प्रतिकार करण्यासाठी वर्तमान पत्राची आवश्यकताहोती.त्यानुसार जनता या वृत्तपत्राचा प्रसार समाजात करुन लोकजागृतीचे कार्य आरंभीले.ते ४ फेब्रुवारी १९५६ रोजी'जनता'चे'प्रबुध्द' भारतात रुंपातर होईपर्यंत चार्लावेले.पाव शतक आंबेडकर चळवळीचे गॅजेट म्हणून या वृत्तपत्रानी कार्य केले आहे.त्यांच्या विचारांचे व कार्यात्मक विचारांचे एक व्यासपीठ म्हणून कार्य केले आहे.१९३० ते १९५६ या दिर्घ कालखंडातील त्यांच्या जीवनातील अंत्यत महत्वाच्या कार्यात्मक चळवळीचा त्यात समावेश झालेला आहे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

समग्र अस्पृश्य जातीच्या भवितव्याची मांडणी करणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता, व न्यायाची प्रस्थापना करणे. समतादृष्टीतीलहिंदूसमाजाची मांडणी करणे, दलितांना स्वालंबनाचे मार्ग सांगणे, त्यांच्यावरिल अन्यायाला वाचा फोडणे, अन्याय विरुध्द संघर्ष करण्यास समर्थ बनविणे, शिकासंघटीत व्हा आणि अन्याय-गुलामी विरुध्द संघर्ष करण्याचा मंत्र त्यांच्या मनात रुजविणे, विषमतावादी पारंपारिकहिंदूसमाजातील व्यवस्थापक मूल्यात परिवर्तन घडवून आणणे. राष्ट्रनिष्ठा बिंबविणे, जातीय व्यवस्था निर्मुलन करणे, विषमतावादी धर्मतत्वज्ञांच्या विरुध्द लोकमततयार करणेही सर्व उद्दिष्टे त्यांच्या वृत्तपत्राची होती.

'जनता' वृत्तपत्राने झोपलेल्यांना जागे करणे, जागे झालेल्यांना बसते करणे, बसलेल्यांना उभे करणे, आणि अखेर क्रियावंत बनविणे म्हणजेच एखादयाला किंवा अनेकांना मुळ प्रश्नांची जाणीव करुन देणे, अन्यायाला वाचा फोडणे, ज्यांना जो आधार हवा त्याला तो आधार देणे, समाज जागा करणेहे जनता वृत्तपत्राचे कार्यहोते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन्हीही वृत्तपत्राची उद्दिष्टे परिवर्तनवादी आणि अधिकाअधिक जनताभिमुख आहेत.त्यांचे अग्रलेखन जन जागृती, समाज परिवर्तन, आणि समाजसुधारणा या संबंधीचे आहेत.ऑक्सर वाईल्ड या इंग्रजीसाहित्यातीलसाहित्यीकांनी वृत्तपत्राच्या शक्तीला एकमेव प्रमुख अशी अधिसत्ता माणली आहे.कारण या अधिसत्तेनेत्यांच्या अलिकडच्या काळातील धर्मसत्ता, राजसत्ता व जनसत्तांना गिळंकृत केलेले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही चोथी अधिसत्ता म्हणजे'वृत्तपत्र' असुनही केवळ मान्वी मनावर सर्वस्वाने अधिकार गाजवीते या मताला सत्य मानलेले आहे.म्हणूनचत्यांनी पुन्हा पुन्हा वृत्तपत्रकारीतेचा प्रारंभ केलेलाहोता.

## समारोप :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रामधून समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याचे कार्य केले.पारंपारिक परंपरांना देखील बाजुला सारण्याचा मुलमंत्र या वृत्तपत्रांनी समाजातील प्रत्येकाला दिला.वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक स्तरावर दलितांच्या प्रश्नांना न्याय मिळावा, त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी.यासाठी वृत्तपत्रांनी महत्वाची भुमिका बजावली आहे. केवळ बहिष्कृतावर होणारा अन्याय, अत्याचाराच्या बातम्या प्रसारित करुन ही वृत्तपत्रे थांबली नाहीततर त्यावर उपाय सुचवणे आणि प्रत्यक्ष कृती करण्याचेही महत्वपूर्ण काम वृत्तपत्राच्या माध्यमांतून झाले आहे. बाबासाहेबांच्या सामाजिक आणि राजकीय माहितीचा ऐतिहासिक दैस्ताऐवज म्हणजेही वृत्तपत्रे आहेत असे म्हणता येईल.

आजच्या काळातील वृत्तपत्राच्या भुमिकेचा अभ्यास करुन आचरण केलेतर नक्कीच कोणावरही अन्याय अत्याचारहोणार नाही.

## संदर्भग्रंथ:-

डॉ. जालिंदर भोसले, आधूनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, पायल प्रकाशन, पुणे
राष्ट्रीय चारित्रमाला ६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर - राष्ट्रीय चारित्रमाला पुणे
डॉ. गंगाधर पानतवणे पत्रकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन पुणे
डॉ. विजया इंगोले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकरीता, स्वरुप प्रकाशन पुणे



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.